# सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ

(पूर्वीचे पुणे विद्यापीठ)

## राष्ट्रीय सेवा योजना

गणेशखिंड, पुणे – ४११ ००७

प्रा.डॉ. गणेश भामे

एम्.ए., पीएच् डी.

**संचालक** (अतिरिक्त कार्यभार)

कार्यालय क्र. : ०२०–२५६२२६८८/८९

: ०२०–२५६२२६९०/९१

: ०२०–२५६२२६९२

: ०२०–२५६९७३४१

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव


संदर्भ : रासेयो/२०२६—२७/११७ स्मरणपत्र—१ दि. ३०/०६/२०२६

प्रति,
मा.प्राचार्य/संचालक,
रासेयो संलग्नित सर्व महाविद्यालये परिसंस्था,
फक्त पुणे जिल्हा,
सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ.

विषय : **'मतदार याद्यांचा विशेष सखोल पुनरिक्षण कार्यक्रम(SIR)-2026' यशस्वीपणे राबविण्याकरिता राष्ट्रीय सेवा योजना विद्यार्थ्यांची नावे स्वयंसेवक म्हणून Google Spread Sheet मध्ये नाव नोंदणी करण्याबाबत...**

संदर्भ : **१.रासेयो/२०२६—२७/७२,दि.०५/०६/२०२६ रोजीचे परिपत्रक**
**२.मा. जिल्हाधिकारी कार्यालय, पुणे(निवडणूक शाखा) यांचे क्र.पीईई३/कावि/६७४/२०२६, दिनांक:२२/०६/२०२६ रोजीचे पत्र**

महोदय,

उपरोक्त विषय आणि संदर्भीय पत्रान्वये आपणास कळविण्यात आले होते की, मा. भारत निवडणूक आयोग, नवी दिल्ली यांचेकडून महाराष्ट्रासह एकूण १९ राज्य आणि ०३ केंद्रशासित प्रदेशामध्ये मतदार यादयांचा विशेष सखोल पुनरिक्षण(SIR) कार्यक्रम जाहीर करण्यात आलेला आहे.

त्यानुसार सदर कार्यक्रम यशस्वीपणे राबविण्यासाठी मतदान केंद्रस्तरीय अधिकारी(BLO) यांना सहाय्य करण्याकरिता राष्ट्रीय सेवा योजनेचे विद्यार्थी स्वयंसेवक म्हणून नियुक्त करण्यात येणार आहेत. त्यानुषंगाने जिल्हयामधील सर्व मतदार संघामध्ये करावयाच्या तयारीबाबत, विशेष सखोल पुनरिक्षण(SIR) कार्यक्रमाच्या माहितीबाबत तसेच मतदारांमध्ये करावयाच्या जनजागृती व व्यापक प्रसिध्दीबाबत माहिती देण्याकरिता व कार्यक्रम यशस्विरित्या राबविण्याकरिता नियोजन बैठकीचे आयोजन दि. ०१ जून २०२६ रोजी करण्यात आले होते.

सदर बैठकीमध्ये सर्वानुमते ठरल्यानुसार 'मतदार याद्यांचा विशेष सखोल पुनरिक्षण कार्यक्रम(SIR)-2026' यशस्वीपणे राबविण्याकरिता राष्ट्रीय सेवा योजना विद्यार्थ्यांची नावे स्वयंसेवक म्हणुन नोंदणी करण्यासाठी निवडणूक शाखा, जिल्हाधिकारी कार्यालय, पुणे यांचेकडून पुणे जिल्ह्यातील विधानसभा मतदारसंघ, तालुकास्तरांवरील मतदान केंद्र क्रमांक, नाव व पत्ता याची मतदान केंद्रस्तरीय अधिकारी(BLO) सह असलेली माहिती Google Spread Sheet मध्ये दिली आहे. सदर Google Spread Sheet लिंकमध्ये आपल्या महाविद्यालयातील रासेयो विद्यार्थ्यांची त्यांच्या परिसरातील त्यांच्या इच्छेनुसार त्यांना अपेक्षित ठिकाणी स्वयंसेवक म्हणून नावनोंदणी तात्काळ करण्यात यावी.

तसेच याबाबतची माहिती BOD लॉगीनमध्ये NSS - Gov Other Reports - Add New - योजना/उपक्रम निवडा यामध्ये उपक्रमाचे नाव **"मतदार याद्यांचा विशेष सखोल पुनरिक्षण कार्यक्रम(SIR)-2026"** या विषयाची निवड करून सादर करण्यात यावा. **अहवाल सादर करताना 'संक्षिप्त अहवाल/अभिप्राय/टिपणी/प्रतिक्रीया' याठिकाणी सदर उपक्रमाकरिता सहभागी विद्यार्थ्यांची माहिती घ्यावी.** आपल्या माहिती व उचित कार्यवाहीकरिता सोबत मा. जिल्हाधिकारी कार्यालयाचा मेल जोडला आहे. कळावे, ही विनंती.

**Google Spread Sheet लिंक :**
https://docs.google.com/spreadsheets/d/13L5Wjcb8KuCVgVHwOeq4wBEquy8P80h4sLJbBsBjNRM/edit?usp=sharing

(स्वाक्षरी)

संचालक (अतिरिक्त कार्यभार)
राष्ट्रीय सेवा योजना

सोबत : मा. जिल्हाधिकारी कार्यालय यांचे पत्र

# जिल्हाधिकारी कार्यालय पुणे (निवडणूक शाखा)

जिल्हाधिकारी कार्यालय पुणे बी विंग 4 था मजला पुणे 411001

फोन नं. 020-26134478 Email – dydeopune१@gmail.com


**निवडणूक अतिमहत्वाचे**

क्र.पीईई3 /कावि/६७४/२०२६ दिनांक :१२/०६/२०२६.

प्रति,

१. कुलसचिव, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ पुणे./ महात्मा फुले कृषी विद्यापीठ, राहुरी ब्रिगेडियर एस.पी.एस. रौतेला, NCC Group Hedquarter, सेनापती बापट रोड, पुणे-411004

२. श्री.अजय शिंदे,प्रादेशिक संचालक, प्रादेशिक संचालनालय, NSS ‘A’ वसतिगृह विभाग, कृषी महाविद्यालय परिसर, शिवाजीनगर, पुणे- 411 005.

३. श्री. डॉ. मिलिंद काळे,राज्य एनएसएस अधिकारी, (अतिरिक्त प्रभार) राज्य एनएसएस सेल,उच्च व तंत्रशिक्षण विभाग, 3, महापालिका मार्ग, धोबी तलाव, मुंबई- ४०० ००१.

४. श्री. डॉ.गणेश भामे,NSS कार्यक्रम समन्वयक, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ,गणेशखिंड,पुणे -०७.

५. श्री. युवराज नाईक, उपसंचालक,क्रीडा व युवक सेवा, पुणे विभाग- पुणे सर्वे नं.191,विभागीय क्रीडा संकुल,महाराष्ट्र हौसिंग बोर्ड,येरवडा,पुणे-411006.

६. डॉ सुनील भांगे.NSS कार्यक्रम समन्वयक महात्मा फुले कृषी विद्यापीठ राहुरी जि.अ'नगर 413 722

७. डॉ. दीपक माळी, सहाय्यक संचालक व रा.से.यो. कार्यक्रम समन्वयक, शिक्षण संचालनालय (माध्यमिक व उच्च माध्यमिक), महाराष्ट्र राज्य, सेंट्रल बिल्डिंग, पुणे – 411001

८. श्रीकांत मडावी, एनएसएस कार्यक्रम समन्वयक, पॉलिटेक्निक महाराष्ट्र तंत्र संचालनालय. शिक्षण, ३ महापालिका मार्ग, P. B. क्र. १९६७, मुंबई -४००००१.

९. श्री. पी. डी. डोंगरे, NSS कार्यक्रम समन्वयक (ITI - महाराष्ट्र राज्य), व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालय, 3 महापालिका मार्ग, पोस्ट बॉक्स क्र. 10036, मुंबई - 400 001.

१०. श्री. जसवंतसिंग तवर, गट मुख्यालय,रा.छा.से.,पुणे

११. श्रीमती.शुभांगी कुलकर्णी, 2 महाराष्ट्र बटालियन मुलांचे, रा.छा.से.,पुणे

१२. श्री. कैलास गावडे, 3 महाराष्ट्र आर्मर्ड, रा.छा.से.,पुणे

१३. श्री.हनुमंत ननावरे, 1 महाराष्ट्र सिग्नल कं., रा.छा.से.,पुणे

१४.श्री. वैजिनाथ बोबडे,3 महारष्ट्र हवाई पथक, रा.छा.से.,पुणे

१५.श्री. गोविंद बापर्डेकर,2 महारष्ट्र बटालियन,मुलींचे, रा.छा.से.,पुणे

१६. श्री.सँमसन जाधव,36 महाराष्ट्र बटालियन, रा.छा.से.,पुणे

१७.श्री. महेश सोलनकर,३ महाराष्ट्र नाविक दल, रा.छा.से.,पुणे

१८. पुणे जिल्ह्यातील सर्व,

a. NSS/NCC विद्यापीठ समन्वयक,

b. NSS/NCC जिल्हा समन्वयक,

c. NSS/NCC एरिया समन्वयक,

d. NSS/NCC महाविद्यालय समन्वयक,

e. Self-Financing असलेल्या विद्यापीठा/संस्था, NSS/NCC समन्वयक.

विषय :- **मतदार याद्यांचा विशेष सखोल पुनरिक्षण कार्यक्रम** (SIR)-2026.
विशेष सखोल पुनरिक्षण कार्यक्रम यशस्वीपणे राबविण्याकरिता राष्ट्रीय सेवा योजना मधील विद्यार्थ्यांची नावे Google Excel Spreed Sheet मध्ये स्वयंसेवक म्हणून नोंदविणेबाबत.

संदर्भ : १) मा. भारत निवडणूक आयोग, नवी दिल्ली यांची प्रेस नोट No.ECI / PN / ०८६ / २०२६, दि.14/05/2026.
२) दिनांक 01 जून 2026 रोजी जिल्हाधिकारी कार्यालय येथे पार पडलेली NSS समन्वयक यांची बैठक.
३) या कार्यालयाचे पत्र क्रमांक ५८५ दिनांक ०२.०६.२०२६

मा.भारत निवडणूक आयोग, नवी दिल्ली यांचेकडून उपरोक्त संदर्भीय प्रसिद्धी पत्रकाद्वारे महाराष्ट्रासह एकूण १९ राज्य आणि ०३ केंद्रशासित प्रदेशामध्ये मध्ये मतदार याद्यांचा विशेष सखोल पुनरिक्षण (SIR) कार्यक्रम जाहीर करण्यात आलेला आहे. विशेष सखोल पुनरिक्षण (SIR) कार्यक्रम हा महाराष्ट्रामध्ये दि.20/06/2026 ते दि.07/10/2026 कालावधी मध्ये सुरु झालेला आहे.

त्यानुसार सदर राष्ट्रीय कार्यक्रम यशस्वीपणे राबविण्यासाठी मतदान केंद्रस्तरीय अधिकारी (BLO) यांना सहाय्य करण्याकरिता NSS/NCC चे विद्यार्थी स्वयंसेवक म्हणून नियुक्त करण्याबाबत विचाराधीन होते. त्याअनुषंगाने जिल्हातील सर्व मतदारसंघामध्ये करावयाच्या तयारीबाबत, विशेष सखोल पुनरिक्षण (SIR) कार्यक्रमाच्या माहितीबाबत तसेच मतदारांमध्ये करावयाच्या जनजागृती व व्यापक प्रसिद्धीबाबत माहिती देणेकरीता व कार्यक्रम यशस्विरित्या राबविणे कामी NSS/NCC चे महाविद्यालय समन्वयक, एरिया समन्वयक, जिल्हा समन्वयक व विद्यापीठ समन्वयक यांचे सोबत दि.01 जून 2026 रोजी जिल्हाधिकारी कार्यालय, पुणे येथे बैठक आयोजित करण्यात आलेली होती.

**सदर बैठकीमध्ये खालील विषयांवर चर्चा करण्यात आली :-**

- विशेष सखोल पुनरिक्षण कार्यक्रम (SIR) बाबत माहिती.
- विशेष सखोल पुनरिक्षण कार्यक्रम (SIR) प्रभावीपणे राबविण्यासाठी NSS/NCC स्वयंसेवकांचा कृती आराखडा.
- मतदान केंद्रस्तरीय अधिकारी (BLO) यांना NSS/NCC स्वयंसेवकांकडून सहाय्य उपलब्ध करून देण्याची कार्यपद्धती.
- घरभेटी, मतदार पडताळणी व माहिती संकलन प्रक्रियेत स्वयंसेवकांचा सहभाग.
- जनतेमध्ये मतदान यादीबाबत जनजागृती, लोकशाही बळकटीकरण प्रक्रिया अशा राष्ट्रीय कर्तव्यासाठी युवकांचा सहभाग.
- स्वयंसेवकांचे प्रशिक्षण, जबाबदाऱ्या व कार्यपद्धती निश्चित करणे.
- NSS/ NCC स्वयंसेवक यांनी या राष्ट्रीय कार्यात सहभाग घेतलेसाठी शासन स्तरावरून प्रमाणपत्र देण्याचे विचाराधीन आहे.

सदर बैठकीमध्ये सर्वानुमते ठरल्यानुसार, राष्ट्रीय सेवा योजना (NSS) व राष्ट्रीय छात्र सेना (NCC) च्या विद्यार्थ्यांची स्वयंसेवक म्हणून नोंदणी करण्यासाठी निवडणूक शाखा, जिल्हाधिकारी कार्यालय,पुणे यांचेकडून पुणे जिल्हातील विधानसभा मतदारसंघ, तालुकास्तरांवरील मतदान केंद्र क्रमांक, नाव व पत्ता याची BLO सह

असलेली माहिती Google Spreed Sheet लिंकद्वारे (https://docs.google.com/spreadsheets/d/१३L५Wjcb८KuCVgVHwOeq४wBEquy८P८०h४sLJbBsBjNRM/edit?usp=sharing) सर्व NSS व NCC समन्वयक यांना share करण्यात येत आहे. सदर link मधील आपल्याकडील नोंद असलेले NCC व NSS च्या विद्यार्थ्यांची नोंदणी संबंधित विद्यार्थ्यांचा रहिवास असलेल्या भागातील त्यांचे इच्छेनुसार त्यांना अपेक्षित ठिकाणी करण्यात यावी.

सदर Google Spreed Sheet मध्ये NCC व NSS च्या पुणे जिल्ह्यातील सर्व समन्वयक यांचेकडून सदरहू माहिती तातडीने भरण्यात यावी, जेणेकरून आपणाकडून नोंदणी केलेल्या NSS व NCC च्या स्वयंसेवक यांना निवडणूक शाखा, जिल्हाधिकारी कार्यालय, पुणे यांचेकडून दि.15 जुलै 2026 ते दि.30 जुलै 2026 या कालावधी दरम्यान मतदार याद्यांचा विशेष सखोल पुनरिक्षण कार्यक्रम SIR-2026 करीता प्रशिक्षण आयोजन करता येईल.

तरी पुणे जिल्ह्यातील सर्व NSS/NCC समन्वयक (विद्यापीठ , जिल्हा, एरिया, महाविद्यालये, Self-Financing असलेल्या विद्यापीठ / संस्था) यांनी वरीलप्रमाणे अद्याप कार्यवाही केलेली नाही कृपया ती प्रथम प्राधान्याने होणेबाबत सस्नेह विनंती आहे.

( मिनल कळसकर )
उपजिल्हाधिकारी तथा
उपजिल्हा निवडणूक अधिकारी, पुणे

प्रत: १) मा.मुख्य निवडणूक अधिकारी, महाराष्ट्र राज्य, मुंबई 400 032 यांना माहितीस्तव सविनय सादर.
२) मा.विभागीय आयुक्त, पुणे विभाग, पुणे (सामान्य प्रशासन शाखा) यांना माहितीस्तव सविनय सादर.